**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन मुंबई यांचे कार्यालय**
एस.आर.अे.बिल्डींग, अे-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा(पू), मुंबई-400 051.
कार्यालय फोन व फॅक्स क्र: 022-26591586, E-mail: ccfmangrove@mahaforest.gov.in

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ २६ /सन २०१७-१८
बांद्रा, मुंबई ४०० ०५१ दिनांक: २४/०५/२०१८.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **१४** वी बैठक दिनांक **२४/०४/२०१८** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची १४ वी मासिक बैठक दि.२४/०४/२०१८ च्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.**

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | a) श्री.अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220)<br>b) श्री. फ्रान्सिस डिसोजा:- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | या तक्रारीं संदर्भात तहसिलदार वसई आणि RDC पालघर हे उपस्थित होते. तहसिलदार वसई त्यांनी सदर जागेवर महापालिका, महसूल आणि वन विभागामार्फत सर्वे करण्यात आला. या सर्वेमध्ये १० तलाव दिसून आले असून तेथे कोळंबी प्रकल्प आढळून आले आहेत. सदर जागेवर झालेले अतिक्रण हटविण्यास अजून किती कालावधी लागेल असे समितीने तहसिलदार वसई यांना विचारणा केली असता त्यांनी १५ दिवसात या जागेवरील अतिक्रमण हटविण्यात येईल असे सांगितले. सदस्य सचिवांनी या तक्रारी संदर्भात केलेली कार्यवाही, पत्रव्यवहार समितीच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत तहसिलदार वसई यांना सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, पालघर |
| २ | a) श्री. कुलदिप चौधरी (मौजे नायगाव जि. पालघर )<br>b) श्री. अनिकेत स. वाडीवकर (आगाशी ता. वसई जि. पालघर)<br>c) श्री. मॅकेन्झी डांबरे (भुईगांव, वसई जि. पालघर)<br>d) श्री. स्टॅलिन डी (आगाशी ता. वसई जि. पालघर) | समितीने सदर जागेचे Restoration करुन जागेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल,छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्याबाबत दि.२७.०२.२०१८ च्या बैठकीत सांगितले होते. तहसिदलार वसई यांनी सदर जागेवर भराव केलेला आहे तो काढण्याचे काम चालू असून सध्या ७१ ब्रास भराव काढण्यात आला आहे. उर्वरित डेब्रिज पाणथळ जागा असल्यामुळे तेथील डेब्रिज हटविण्याचे काम लवकरच पुर्ण होईल असे तहसिलदार वसई यांनी सांगितले. सदस्य सचिवांनी सदर जागेवर कांदळवनाच्या लागवडीसाठी वन विभागाचे मार्गदर्शन घेण्याबाबत सांगितले तसेच कांदळवनाची लागवड या मे महिन्यात High salinity असल्यामुळे करणे योग्य नसल्याने पावसाळा संपल्यानंतर (सप्टेंबर, ऑक्टोबर) किंवा जून, जुलै महिन्यात म्हणजेच त्या जागेवर पाण्याची भरती नसल्यास कांदळवन लागवड करण्यास सदस्य सचिवांनी तहसिलदार वसई यांना सांगितले. | जिल्हाधिकारी, पालघर |
| ३ | श्री. रोहित जोशी :- (स्वामी समर्थमार्ग.कोपरीठाणे.पुर्व) | सदर जागेवर Plantation करण्यासंदर्भात समितीने दि.२७.०२.२०१८ च्या बैठकीत आदेश दिले होते. त्या अनुषंगाने सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्याकडून १०,००० कांदळवनाची रोपे देणार असून विभागीय व्यवस्थापक | ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वनप्रकल्प विभाग ठाणे यांचेतर्फे रोप लावण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे व त्याबाबतची छायाचित्रे देखील अहवालत दिलेली आहेत असे उप आयुक्त ठाणे महानगरपालिकेने सांगितले.<br>श्री. स्टॅलिन यांनी सदर जागेवरील रस्ता बंद करण्याबाबत सांगितले जेणे करुन सदर जागेवर भराव पुन्हा होऊ नये. त्या अनुषंगाने उपस्थित प्रादेशिक अधिकारी, प्रदमुषण नियंत्रण अधिकारी यांनी सदर जागेवर सी.सी.टी.व्ही कॅमेरा आणि सूचना फलक लावू जेणेकरुन तेथे कोणत्याही वाहन पुन्हा डेब्रिज टाकणार नाही असे समितीला सांगितले. | |
| ४ | New Link Road Residence Forum, Dahisar West :- | समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पुन्हा नव्याने गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या आणि सदर जागा लवकरात लवकर Restore करण्याबाबत सांगितले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी बोरीवली न्ययालयाच्या आदेशानुसार पॅन इंडिया वर पुन्हा गुन्हा दाखल करता येणार नाही असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना संबंधित न्यायालयाचे आदेश आणि या बाबतचा सुपूर्ण अहवाल सादर करण्यास सांगितले. तसेच जागेचे Restoration चे काम विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या सूचनेप्रमाणे चालू करण्यात यावे असे सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ५ | धीरज परब:-<br>ईमेलद्वारा प्राप्त अर्ज | या तक्रारी संदर्भात श्री. धिरज परब यांनी दिलेल्या तक्रारींचे ठिकाण आणि कार्यवाही केलेल्या जागेचे ठिकाण यात फरक असल्याने योग्य जागेचे ठिकाण जाणून घेण्याबद्दल सांगितले होते. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने SDO ठाणे, वन विभाग तसेच श्री. स्टॅलिन आणि श्री. धिरज परब यांच्याशी एकत्र येऊन सर्वे करण्यात आला त्यात एकूण २३ जागेची स्थळ पहाणी करण्यात आली आहे असे उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सांगितले. यात बहुतेक जागा ही सॉल्ट विभागाच्या, काही खाजगी आणि शासकीय आहेत. त्यानुसार संबंधित सर्वांना पत्र पाठविण्यात आले आहेत आणि खाजगी जागेवर ज्यांनी अतिक्रमण केले आहे त्यांनाही पुढील आठवडयात नोटीस देण्यात येणार आहे असे उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सांगितले. या सर्व झालेल्या चर्चेनुसार सदस्य सचिवांनी श्री. धिरज परब यांच्याकडून ६ तक्रारींबाबत त्या जागेच्या अनुषंगाने प्रत्येक तक्रारीचा | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एक वेगळा अहवाल (Separate Report) जागेवर केलेली कार्यवाही, संबंधित कागदपत्र, छायाचित्रे एका आठवडयात पाठविण्याबाबत उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सांगितले. | |
| ६ | श्री. नंदकुमार पवार:- (बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | सदस्य सचिवांनी सदर जागा Restore करण्यासाठी उपवनसंरक्षक ठाणे यांच्याकडे पत्र पाठविण्यात आले आहे असे सांगितले होते. त्यानुसार उपवनसरंक्षक ठाणे यांनी अंजूर दिवा येथील अतिक्रमरण हटविण्यात आले आहे त्या बाबतचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे त्यानुसार समितीने उपवनसंरक्षक ठाणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत सांगितले. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून अद्याप कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांना सदर जागेची FIR प्रत आणि केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती देण्याबाबत समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांना सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे, उपवनसंरक्षक ठाणे |
| ७ | श्री. नंदकुमार पवार :- **Water reclamation at Bhandup,east opposite menon college.** (स्थळ:- भांडूप (पूर्व), मुंबई) | सदर जागेचे डेब्रिज हटविण्यासाठी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी BMC/MCGM यांना पत्र देण्यात आले आहे असे सांगितले होते. या तक्रारी संदर्भात सहाय्यक आयुक्त यांच्या अहवालानुसार सहाय्यक अभियंता (घकव्य) यांनी एस विभागातर्फे दोन उपद्रवशोधक व दहा हंटर सिक्युरिटीचे मार्शल घेऊन दररोज १०.३० ते ६.३० पर्यंत रात्रपाळी मध्ये नियुक्ती केलेली आहे. तसेच अनधिकृतरित्या डेब्रिज डंपिंग थांबविण्याबाबत वरिष्ठ पोलिस निरिक्षक कांजूर स्टेशन यांना देखील पत्र पाठविण्यात आलेले आहे तसेच सदर भूभाग हा उप अधिक्षक (मिठागरे) यांच्या अखत्यारित येत असल्याने त्यांच्यामार्फत सुध्दा भूभागावर भरणी होऊ नये म्हणून या जागेवर लक्ष ठेऊन कारवाई करण्यास सांगितले आहे असे बैठकीत सांगितले. सदस्य सचिवांनीही या तक्रारी संबंधी कांजूर DCP पोलीस स्टेशन यांना पत्राद्वारे कळविण्यात येईल असे समितीने सूचीत केले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ८ | श्री. नंदकुमार पवार:- Distruction and reclamation of mangroves and Wetlands at Dronagiri Node, Uran. | या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना योग्य जागेची स्थळ पहाणी करण्यास व तक्रारदारास पत्र पाठवून संपर्क करण्यास सांगितले व केलेला पत्रव्यवहार अहवालासोबत सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार उपस्थितअप्पर जिल्हाधिकारी रायगड स्थळ पहाणी करण्यात आली असून त्या बाबतचा अहवाल ४ दिवसात समितीपुढे सादर करु असे सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड आणि सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | अज्ञात व्यक्ती - KW2<br>Lots of trucks dumpers dumping the red clay in Mangrove. (स्थळ:- सेक्टर-२३ घनसोली, नवी मुंबई ) | या तक्रारी संदर्भात सिडको यांना सदर जागेवरील डेब्रीज हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सिडको यांनी या जागेवर काम सुरु असून काम पुर्ण करुन Restoration बाबतचा अहवाल दोन दिवसात पाठविण्याबाबत समितीला सांगितले. | सिडको |
| १० | तक्रारदार श्री. सचिन देसाई<br>**Complaint ID No- KW3**<br>विषय :- Illegal construction of Skywalk in Dhamapur Lake<br>(स्थळ :- धामापूर जि. सिंधुदुर्ग) | या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी सिधुदुर्ग यांच्या दि.09.03.2018 च्या अहवालामध्ये पुढीलप्रमाणे मुद्दे सादर केलेले आहेत.<br>१.स्थळपहाणीमध्ये स्कायवॉकचे केलेले बांधकाम हे तलावाच्या कडेला केलेले आहे.<br>२. सदरचा तलाव हा जलसंपदा विभागाच्या अखत्यारित येत आहे.<br>३. सदरचे बांधकाम करताना जलसंपदा विभागाने पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी न घेता बांधकाम करण्यास परवानगी दिलेली आहे.<br>४. सदरचा तलाव हा देखभालीसाठी कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग रत्नागिरी यांच्या ताब्यात आहे. त्याची ना हरकत परवानगी धेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरचे बांधकाम केलेले आहे.<br>५. सदरच्या बांधकामामुळे पाण्याचा स्त्रोत धोक्यात येण्याची किंवा पाणी दुषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>६. या बाबत भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण विभाग यांना चौकशी करुन अभिप्राय देणेबाबत जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडून कळविण्यात आले आहे.<br>७. सदरचा तलाव हा वेटलॅन्ड क्षेत्र म्हणून घोषित झालेला नाही.<br>८. सदर कामाला हरित लवादाकडूनसुध्दा स्थगिती देण्यात आलेली असून सदरचे प्रकरण हरित लवादाकडे न्यायप्रविष्ट आहे.<br>परंतु, सदस्य सचिवांनी धामापूर तलाव हे NWIA यादीतील असल्याचे समितीला सांगितले.<br>वरील सर्व मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने सदर प्रकरण NGT च्या अंतर्गत येत असल्याने सदर तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| ११ | तक्रारदार श्रीमती मिनल देसाई<br>**Complaint ID No- KW4**<br>विषय:- Petrol boat is being run at Dhamapur Lake.<br>(स्थळ :- धामापूर जि.सिंधुदुर्ग) | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांनी योग्य जागेची माहिती उपलब्ध नसल्याने नेमक्या कोणत्या त्यानुसार समितीने ठाणे महानगरपालिकेला तक्रारदारास दुरध्वनीद्वारा संपर्क करुन संपूर्ण माहिती घेण्यास | जिल्हाधिकारी,ठाणे आणि महानगरपालिका ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | तकारदार श्री. अक्षय पाटील<br>**Complaint ID No- KW5**<br>Website द्वारा तक्रार प्राप्त दि.१२.०२.२०१८ -<br>विषय:- Illegal mangrove cutting<br>(स्थळ :- विटावा ता. जि. ठाणे) | सांगितले होते. परंतु तक्रारदाराकडून अद्याप कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही असा अहवालही त्यांनी समितीच्या बैठकीत सादर केला. | |
| १३ | श्रीमती श्वेता भट<br>दि.०६.०२.२०१८<br>Destriction of mangrove behind Hiranandani, Kavesar, Thane. | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांनी त्यांचा अहवाल त्यांनी सादर केला. तक्रार दाराशी प्रत्यक्ष चर्चा करुनही कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झालेली नाही. NWIA यानुसार सदर ठिकाणी पाणथळ जागा नसल्याचे दिसून येत नाही. समितीने पुन्हा MRSAC या संकेतस्थळावर तपासणी करण्यास आणि या संदर्भात पंचनामा आणि तक्रारदारांची स्वाक्षरी घेऊन संपुर्ण माहिती समितीपुढे सादर करण्याबाबतच्या सूचना समितीने दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, ठाणे आणि महानगरपालिका ठाणे |
| १४ | तकारदार श्री. स्टॅलिन डी<br>Email द्वारा तक्रार प्राप्त दि.१५.०२.२०१८<br>विषय :- Illegal dumping on wetlands along JVLR and Eastern express highway<br>(स्थळ :- जोगेश्वरी विक्रोळी रोड, मुंबई) | या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी स्थळ पहाणी केली असून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आले आहे असे समितीला सांगितले. श्री. स्टॅलिन यांनी JVLR ला लागून असलेले जे दोन गेट आहेत ते बंद करण्याबाबत सांगितले जेणेकरुन त्या ठिकाणी डेब्रिज पुन्हा जमा होणार नाही. त्यानुसार समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर जागेवरील गेट बंद करण्याबाबच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| १५ | श्री. धिरज परब<br>भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास झाल्याबाबत.<br>स्थळ :- भाईंदर पश्चिम, जि.ठाणे. | या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी ही तक्रार आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना पाठविण्यात आली आहे असे सांगितले. त्यानुसार समितीने उपस्थित उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सदर जागेवर महसूल व सॉल्ट विभागामार्फत सर्वे करण्यात आला असून त्यावेळी श्री. स्टॅलिन व श्री. धिरज परब हे ही उपस्थित होते असे सांगितले. त्यानुसार समितीने उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना या तक्रारी संदर्भात संपूर्ण माहिती व स्पष्टीकरण अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी देण्याबाबतचे आदेश दिले. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| १६ | श्री. धिरज परब<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत.<br>स्थळ :- भाईंदर पश्चिम जि. ठाणे. | या तक्रारी संदर्भात उपआयुक्त मिरा-भाईंदर यांनी श्री. स्टॅलिन यांच्या सोबत स्थळपाहाणी करण्यात आली असून ही जागा खाजगी असल्याचे त्यांनी सांगितले आणि तेथे डेब्रिज टाकण्यात आले आहे असे सांगितले. समितीने या तक्रारी संदर्भात FIR दाखल केली आहे की | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नाही याची विचारणा केली असता या तक्रारी संदर्भात अद्याप FIR दाखल करण्यात आलेली नाही असे उपआयुक्त मिरा-भाईंदर यांनी सांगितले. त्यानुसार समितीने या तक्रारी संदर्भात FIR दाखल करुन या जागचे Restoration करण्याचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्याबाबतचे आदेश दिले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, आवश्यक कागदपत्रे संबंधित छायाचित्रे पुढील बैठकीपूर्वी पाठविण्याबाबत आयुक्त मिरा-भाईंदर यांना सांगितले. | |
| १७ | तक्रारदार अभिव्यक्ती गृप<br>Please save Secctor 19 Pond<br>स्थळ:- सेक्टर १९ खारघर, नवी मुंबई. | या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी बैठकीमध्ये ही तक्रार एम.डी. सिडको आणि जिल्हाधिकारी ठाणे यांना पाठविण्यात आली असून सिडको यांच्या प्रतिनिधींशी दुरध्वनीवर चर्चा देखील करण्यात आली आहे असे सांगितले. समितीने सिडको यांना सदर जागेवर स्थळ पहाणी करुन सदर जागेवर Reclamation होत असल्यास ते थांबविण्यास आणि संबंधितांवर कार्यवाही करुन या बाबत कलेल्या कार्यवाहीचा अहवाल आवश्यक ती कागदपत्रे समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत आदेश दिले. तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्त यांच्या कडून कोणीही प्रतिनीधी बैठकीत उपस्थित नसल्याने समितीने सदस्य सचिवांना नवी मुंबई पोलीस यांच्या प्रतिनीधीस पुढील बैठकीमध्ये उपस्थित राहण्याबाबतचे पत्र पाठविण्यास सांगितले. | सिडको |
| १८ | श्री. स्टॅलिन डी<br>Massive illegal reclamation of coastal wetland at Mumbra by Thane Municipal corporation. | ही तक्रार सदस्य सचिवांनी आयुक्त महानगरपालिका ठाणे यांना पाठविण्यात आली आहे असे समितीला सांगितले. ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनीधींनी सदर जागेची स्थळ पहाणी अद्याप केलेली नाही असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने सदर जागेची तक्रारदारा सोबत स्थळ पहाणी करुन या तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण अहवाल आणि संपूर्ण माहिती समितीच्या पुढील बैठकीपूर्वी देण्याबाबतचे आदेश ठाणे महानगरपालिकेला दिले. | जिल्हाधिकारी ठाणे आणि आयुक्त महानगरपालिका ठाणे. |
| १९ | श्री. नरेशचंद्र सिंघ<br>Please Immediately stop the Destruction of Mangroves, water bodies and wetland in Kharghar. | या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनीधींना सदर जागेचे योग्य ठिकाण माहिती नसल्याचे सांगितले त्यानुसार सदस्य सचिवांनी सिडको यांना योग्य जागेचे ठिकाण या संदर्भात सर्व माहिती सिडको यांना पाठविण्यास व त्या अनुषंगाने सिडको यांना स्थळ पहाणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याबाबत समितीने सांगितले. | सिडको |

<table>
<tr><td>२०</td><td>श्री. विनादे पुन्शी<br>Debris turns Nerul pond into Cricket ground & Another Navi Mumbai water body on the verge of being encroached - TOI Navi Mumbai dated 04/04/18.</td><td>या तक्रारी संदर्भात समितीने श्री. विनोद पुन्शी यांच्या शी केलेल्या चर्चेनुसार त्यांना सदर जागे बद्दल कोणतीही माहिती अवगत नव्हती. सदर जागा ही वन क्षेत्रपाल नवी मुंबई यांनी स्थळ पहाणी केली असता त्यांनी सदर जागा ही Holding Pond साठी असल्याचे समितीला सांगितले. तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांनी त्यांच्या ८ वॉर्जे यांच्या सहाय्याने आता पर्यंत ६८ ट्रक अनधिकृत पकडलेले होते डेब्रिजच्या तसेच दि.१ एप्रिल पासून २७ ट्रक अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्यांवर कार्यवाही चालू आहे तसेच यामधून आतापर्यंत रु. ७.३५ लाख इतकी वसूली करण्यात आली असून सदर जागेवर चर खोदण्यात सुरुवात करण्यात आली आहे जेणेकरुन तेथे वाहन जाऊ नये अशी माहिती दिली. समितीने वरील सर्व माहितीबाबतचा अहवाल आणि सदर तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने सांगितले.</td><td>नवी मुंबई, महानगरपालिका</td></tr>
<tr><td>२१</td><td>इतर विषय</td><td>१) समितीच्या अध्यक्षांनी दि.२१.१२.२०१७ च्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे सुचित केले की प्रत्येक जिल्हयातून त्या वन विभागाशी सल्लामसलत करुन कमीत कमी एक अशी योग्य त्या वेटलॅन्ड क्षेत्राची निवड करावी जी जैवविविधतेने व पर्यावरणीयदृष्टया महत्वाची आहे. जेणेकरुन स्थानिक नागरीकांच्या सहाय्याने वेटलँन्ड क्षेत्र पर्यटन स्थळ (Eco-Tourism) म्हणून विकसीत करता येईल. प्रात्प जिल्हयांची माहिती पुढील तकत्यात दिली आहे.
<table>
<tr><th>जिल्हा</th><th>निवडलेले पाणथळ क्षेत्र</th></tr>
<tr><td>ठाणे</td><td>रेती बंदर, पारसिक</td></tr>
<tr><td>मुंबई उपनगर</td><td>बोरीवली</td></tr>
<tr><td>मुंबई शहर</td><td>-</td></tr>
<tr><td>रायगड</td><td>मुरबे खालापूर व फेटवणे</td></tr>
<tr><td>रत्नागिरी</td><td></td></tr>
<tr><td>सिंधुदुर्ग</td><td></td></tr>
<tr><td>पालघर</td><td>पानजु ता. वसई</td></tr>
</table>
जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी या करिता स्थळ पहाणी चालू असल्याचे सांगितले. रत्नागिरी जिल्हयात पर्यटनाच्या दृष्ट्रीने अद्याप कोणतेही ठिकाण नसल्याचे उपस्थित प्रतिनीधींनी सांगितले त्यानुसार समितीने त्यांना योग्य पाणथळ जागा सूचविण्यास सांगितले.</td><td>सर्व जिल्हाधिकारी</td></tr>
<tr><td></td><td></td><td>२) सदस्य सचिवांनी समितीला मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पाणथळ तक्रार निवारण समितीच्या</td><td>सर्व सदस्य</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | बैठकीत झालेल्या तक्रारींचा सध्य:स्थिती अहवाल आणि पाणथळ जागेच्या Restoration संदर्भात अहवाल मा.उच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान सादर करावा लागतो. त्यानुसार जागेचे Restoration करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि त्या संबंधित सर्व कागदपत्रे, छायाचित्रे या संबंधी माहिती अद्याप समितीपुढे प्राप्त झालेली नाही असे सदस्य सचिवांनी बैठकीत सांगितले. त्या अनुषंगाने या विषयावर गांभिर्यपूर्वक विचार करुन प्राधान्याने या संबंधी संपूर्ण माहिती समितीपुढे योग्य वेळी सादर करावी असे आदेश पाणथळ तक्रार निवारण समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात आले आहेत. | |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

उप आयुक्त (महसुल)
कोकण विभाग

अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रारनिवारण समिती
तथा
विभागीयआयुक्तकोकण विभाग